दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ४ थे अंक १७८ वा शनिवार दि.२८ डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी घेतली नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांची भेट

### वंचित बहुजन आघाडी कार्यकर्त्यामधे नवचैतन्याचे वातावरण





नवी मुंबई / के. एच. हनवते :- वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष, बहुजन हृदयसम्राट, ड. प्रकाशजी तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी नवी मुंबई महानगर पालीका आयुक्त : डॉ. कैलासजी शिंदे साहेब यांची भेट घेऊन नवी मुंबईतील कामगारांच्या विविध समस्यांवर तसेच सीवूड्स मधील नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त : कैलासजी शिंदे साहेब यांची भेट घेऊन त्यांनी पुढील विषयावर सविस्तर चर्चा केली. नवी मुंबई मधील करार पध्दतीने असलेल्या कर्मचाऱ्यांना समान काम समान वेतन लागू करावे, मुंबई मधील केईएम सायन हॉस्पिटल सारखे सुसज्ज अत्याधुनिक यंत्रणा आणि सोई सुविधा आपल्या वाशी येथील हॉस्पिटलमध्ये सुरु कराव्यात, रुग्णवाहिका चालक कामगारांना कुशल वर्गवारीनुसार वेतन अदा करणे, आदिवासी पाडा येथील नागरिकांसाठी सुव्यवस्थित रस्ते, गटार, शौचालय, ड्रेनेज लाईनची व पाण्याची सोय करण्यात यावी, सीवूड्स विभागातील तात्पुरत्या स्वरुपाची शौचालय काढुन त्याठिकाणी कायम स्वरुपी आर.सी.सी बांधकामाचे कायमस्वरुपी शौचालय उभी करावी, सेक्टर ५० जुने ते डी.पी.एस शाळेला जाण्यासाठी स्काय वॉक ब्रिजची निर्मिती करावी, अशा विविध विषयांवर चर्चा आयुक्त साहेबांची व ड. प्रकाश आंबेडकर साहेबांची सकारात्मक चर्चा झाली. तद्नंतर कार्यकर्त्यांशी संवाद केला येत्या महानगरपालिकेच्या निवडणुका वंचित बहुजन आघाडी ताकदीने लढण्यावर भर देण्याचा संदेश ड. प्रकाशजी आंबेडकर यांनी कार्यकर्त्यांना दिला. यावेळी वंचित बहुजन आघाडी सिवूड्स विभागाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयाबाहेर ड. प्रकाश आंबेडकर यांचे जंगी स्वागत करण्यात आले कार्यकर्त्यात एक उत्साह व जोशपूर्ण वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले या भेटीचे आयोजन नियोजन ॲड. संदेशजी मोरे साहेब आणि वंचित चे सिवुडस विभागप्रमुख ड. उमेश हातेकर यांनी केले. यावेळी नवी मुंबईतील आजी माजी पदाधिकारी व कार्यकर्ते शेकडोंच्या संख्येत उपस्थित होते.

## विभागीय रेल्वे सल्लागार समितीच्या सदस्यपदी अविनाश कोळी यांची निवड



लातूर :- विभागीय रेल्वे वापरकर्ते सल्लागार समितीची पुनर्रचना करण्यात आली असून विशेष स्वारस्य श्रेणी सदस्यपदी भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते अविनाश जालिंदर कोळी यांची निवड करण्यात आली आहे. अविनाश कोळी यांचे भारतीय जनता पार्टीच्या संघटन कार्यात मोलाचे योगदान राहिलेले आहे. तुळजा भवानी रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी तत्कालीन रेल्वे मंत्र्यांशी सातत्याने पाठपुरावा करून तुळजापूरला फिरत्या रेल्वे आरक्षण केंद्राची सुरुवात करण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. त्यासाठी त्यांनी तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, रेल्वे मंत्री , रेल्वे बोर्डाचे अध्यक्षांशी पाठपुरावा करून रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी ही सुविधा सुरु करण्याकामी मोलाचे योगदान दिले आहे. सोलापूर - तुळजापूर - उस्मानाबाद या लोहमार्गाच्या उभारणीसाठीही तुळजा भवानी रेल्वे संघर्ष समितीच्या माध्यमातून त्यांनी उल्लेखनिय लढा देण्याचे काम केले आहे. रेल्वे मार्गाच्या उभारणीमुळे तुळजापूर रेल्वेच्या नकाशावर येणे अत्यंत गरजेचे आहे . तसेच साडेतीन पीठांपैकी एक तीर्थक्षेत्र असल्याने या ठिकाणी देशाच्या कानाकोपऱ्यातून असंख्य भाविक कायम दर्शनासाठी येत असतात. रेल्वेची सोय झाल्यास भाविकांची मोठी गैरसोय दूर होऊ शकणार आहे, यासाठी त्यांचे विशेष प्रयत्न राहिले आहेत. रेल्वे प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सतत कार्यरत राहणाऱ्या अविनाश कोळी यांची विभागीय रेल्वे सल्लागार समितीच्या सदस्यपदी निवड करण्यात आल्याबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

## राजकारणातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व हरपले माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना धिरज देशमुख यांची श्रध्दांजली



आपल्या दूरगामी व अभ्यासपूर्ण निर्णयांतून भारताला जागतिक पटलावर मानाचे स्थान प्राप्त करून दिलेले माजी पंतप्रधान, जागतिक किर्तीचे अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने भारताचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे. राजकारणातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आपल्यातून हरपले आहे.देश आर्थिकदृष्ट्या अडचणीत असताना आर्थिक सुधारणा घडवून आणत देशाला नव्या उंचीवर घेवून जाण्यात डॉ. मनमोहन सिंग यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी मिळवून दिली. म्हणूनच त्यांचा कार्यकाळ हा देशाच्या इतिहासातील महत्त्वाचा कालखंड मानला जातो. सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी, देशाचा विकास साधण्यासाठी आपले आयुष्य समर्पित केले. देशाचे हित आणि लोकशाहीचे रक्षण हा विचार त्यांनी कायम जपला. ते साधेपणा, विनयशीलता, त्याग आणि करुणेचे प्रतीक होते. त्यांनी भारतासाठी दिलेले गौरवास्पद योगदान देशवासियांच्या कायम स्मरणात राहील. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली करतो.- श्री धिरज विलासराव देशमुख, माजी आमदार, लातूर ग्रामीण

## मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थींना हवाय कालावधी वाढवून





चाकूर / प्रतिनीधी :- चाकूर तालुक्यातील मुख्यमंत्री युर्वां प्रशिक्षणार्थी योजना अंतर्गत अस्थापना प्रशिक्षणार्थ्यांनी विविध मागण्या संदर्भात चाकुर चे तहसीलदार नरसिंग जाधव यांना शुक्रवारी निवेदन देण्यात आले आहे.

तालुक्यातील मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी योजना अंतर्गत अस्थापना प्रशिक्षणार्थी यांनी चाकूर तालुक्याचे तहसीलदार नरसिंग जाधव यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की आम्ही मुख्यमंत्री युवा कार्य अस्थापना प्रशिक्षणार्थी असून या योजनेअंतर्गत शासकीय अस्थापनेतील विविध बाबीचे सखोल मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळत आहे. या योजनेच्या माध्यमातून प्रशासनाची कार्यप्रणाली जवळून समजून घेण्याची संधी मिळाली असून शैक्षणिक वर्षाच्या अनुशंगाने सहा महिण्याचे प्रशिक्षण हे अपूरे होईल किमान शैक्षणिक वर्ष पूर्ण करण्याची बाब विचाराधिन ठेवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व शिकावू शिक्षक यांचे प्रशिक्षण पूर्ण होण्याच्या अनुशंगाने शाळा सहाय्यक शिक्षकांना नियुक्त शाळेवर किमान एक वर्ष प्रशिक्षण मिळावे तसेच प्रशिक्षणाचा कालावधी वाढवून मिळावा,प्रशिक्षणार्थीचे मानधन वेळेत मिळावे,रूजू प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करून संबंधित प्रशिक्षानिर्थीना रूजू करून मानधन मिळावे, प्रशिक्षण घेत असलेल्या अस्थापनेमध्ये पदभरती करत असताना सर्वप्रथम प्राधान्य देण्यात यावे असे निवेदनात नमूद केले आहे.निवेदनावर बसाप्पा तोडकरी,प्रद्युम्न चाटे,सुशील सिरसाठे,मंगेश पांचाळ,प्रशांत ढोबळे,सुषमा कोडे,भाग्यश्री शिंधीकूमटे, अनिता स्वामी, सुप्रिया टिकोरे, वैष्णवी महाजण, मनिषा मिरजगावे,दीपक केंद्रे,प्रताप सावंत,संतोष बने,संगम होनराव आदींच्या स्वाक्षरी आहेत.







## संपादकीय....

# बबड्या रुपया, कारटा डॉलर

वर्तमानाचा विचार करताना देशाची संपत्ती, साधनसामग्री, उपभोग आणि व्यवहार यांची सुसंगत मांडणी अपरिहार्यच. त्यातून उरणारा प्रश्न एवढाच की, आपल्या घरची अर्थव्यवस्था ही चिंताकारक बनली आहे, हे पटते आहे काय? अगदी विपन्नावस्था नव्हे, पण ओढगस्त फार दूर नाही हे वर्तमानाचे सूचित नक्कीच. डॉलरपुढे दिवसेंदिवस ठुसका ठरत असलेला रुपया हेच सांगतो. दोन–अडीच महिन्यांत मोठ्या गतीने त्याने डॉलरमागे पंच्याऐंशीच्या भावनिक पातळीलाही भेदले. हे पाहता स्थिती आटोक्यात येण्यापलीकडे गेली इतके निश्चितच. तरीही चलाखपणात हार मानायची नाही असे काहींनी ठरविलेच आहे. त्यांचे म्हणणे रुपया पडतो असे नव्हे तर जगाच्या आर्थिक व्यवस्थेचे चलन असलेला डॉलर पुष्ट बनत चालल्याचा हा परिणाम आहे. शिवाय रुपया घसरला तर घसरला, त्यायोगे जगाच्या बाजारात आपल्या मालाला मोठी किंमत मिळविता येते. म्हणजेच निर्यातीतून आपले उत्पन्न वाढते. हे काही कमी नाही, असे राज्यशकट चालवणाऱ्यांनाही वाटते. त्यांचे हे वाटणे अपरिपक्व असल्याचे 'लोकसत्ता'ने याआधीही म्हटलेच आहे. आता तर त्यावर देशाचा दुसरा धोरण–ध्रुव असलेल्या रिझर्व्ह बँकेनेही शिक्कामोर्तब केले आहे. रिझर्व्ह बँकेकडून प्रसृत ताजी आकडेवारी आणि तिची उकल या संदर्भात क्रमप्राप्त ठरते. रिझर्व्ह बँक म्हणते की, रुपयाचे हलकेपण हे डॉलरच्या बदल्यात सुरू आहेच. पण त्यापेक्षा भीषण गोष्ट अशी की, भारताकडून व्यापार सुरू असलेल्या जगातील अन्य राष्ट्रांच्या चलनांच्या तुलनेत रुपयाचे मूल्यवर्धन सुरू आहे. एकुणात रुपयाची पटलावरील सार्वकालिक उतरंड आपल्या डोळ्यादेखत सुरू आहेच. हे अधिक भीतीदायी म्हणावे की डॉलरव्यतिरिक्त अन्य चलनांच्या तुलनेत त्याची सशक्तता भयंकर मानावी, हे पाहावे लागेल. ते नेमके सांगणारा निर्देशांक म्हणजे रुपयाचा 'वास्तविक प्रभावी विनिमय दर'. हा दर अर्थात 'रिअल इफेक्टिव्ह एक्स्चेंज रेट (रीअर)' हा द्विपक्षीय व्यापारात कोणाचे पारडे जड हे मापणारा एक सर्वमान्य निर्देशांक आहे. सर्वमान्य म्हणजे जगभरात मान्यता पावलेला असल्याने त्याला नाकारण्याची आपल्या धोरणकर्त्यांनाही संधी नाही, हे मुद्दाम स्पष्ट केले पाहिजे. हा निर्देशांक गेल्या वर्षी एप्रिलमध्ये शंभराखाली– म्हणजे ९९.०३ अंशावर होता. तेथून तो यंदाच्या नोव्हेंबरअखेर १०८.१४ अंशांचा उच्चांक गाठेपर्यंत चढला आहे. सरलेल्या ऑक्टोबरमधील १०७.२० या पातळीवरून अवघ्या महिनाभरात जवळपास एका अंशाची त्यात भर पडली आहे. या निर्देशांकाचा पारा खाली उतरतो तेव्हा भारताच्या निर्यातीला अधिक बरकत येते. परंतु सध्यासारखा पारा चढत जाणे हे भारताच्या द्विपक्षीय निर्यात व्यापाराला मारक ठरते. हे असे का घडते, ते उलगडून पाहूच. त्याआधी रुपयाचे पडणे निर्यातीसाठी फायदेशीर म्हणणाऱ्यांचे बुद्धिवैभव अगाधच आहे, हे कळू द्यावे.

रुपयाचे हे एकीकडे झडणे आणि दुसरीकडे बळावणे असे विचित्र विचलन सध्या सुरू आहे. अमेरिकी चलन म्हणजेच डॉलरचे सबंध जगभरच्या चलनांबाबत बिघडलेले वर्तन हेच यामागील पक्के कारण, हे खरे. तेथे राष्ट्राध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुनरागमनाने डॉलरचे भलतेच फावले आहे. या सामर्थ्यातून त्या चलनाची ही उद्दाम दांडगाई सुरू आहे हेही खरेच. ट्रम्प आणि त्यांच्या संभाव्य धोरण धुडगुसाची अवघ्या जगाने धास्ती घेतली आहे. ट्रम्प यांनी जाहीरपणे म्हटल्याप्रमाणे अमेरिकेत दाखल होणाऱ्या आयात मालावरील सीमाशुल्क सरसकट वाढविल्यास केवळ चीनलाच नव्हे तर कुणासही ते जाचकच ठरेल. तसे झाले तर अमेरिकेतील आताशी काबूत येत असल्याचे दिसलेल्या चलनवाढीलाही ते फुंकर घालणारे ठरेल. हे लक्षात घेऊनच तेथील मध्यवर्ती बँकेने – 'फेड'ने – सुरू केलेले व्याजदर कपातीचे चक्र यापुढे थांबेल असे म्हटले नसले, तरी त्याची गती कमी होईल असे संकेत दिले आहेत. अर्थात कदम आस्ते आस्ते करत थांबणार. हे ताडूनच अमेरिकी रोख्यांच्या परतावा दराने मोठी उचल खाल्ली आहे. गुंतवणूकदारांना मायदेशात चांगला लाभ मिळत असेल तर भारतासारख्या उभरत्या राष्ट्रात तो गुंतवण्याची जोखीम ते घेणारच नाहीत. म्हणूनच परकीय गुंतवणूकदार संस्थांच्या गुंतलेल्या पैशाचे पाय भारतासह, अनेक उभरत्या बाजारपेठांतून वेगाने माघारी फिरत आहेत. भारताबाहेर तो पैसा डॉलररूपाने जात असल्याने, त्यांच्यासाठी डॉलर पुरवता पुरवता रुपयाची पुरेवाट सुरू आहे. हे असे चक्र सुरू असताना, रुपयाचे पडणे हे डॉलरने अन्य चलनांच्या तुलनेत कमावलेल्या सशक्ततेच्या मात्रेइतके नाही, असे ताजा 'रीअर निर्देशांका'चा पारा सुचवतो.


दांडग्या डॉलरपुढे जगातील अन्य चलनांइतका रुपया शरण गेलेला नाही, असा याचा दुसऱ्या शब्दांत अर्थ सांगता येईल. प्राप्त स्थितीत ही फुशारकीची गोष्ट खचितच नाही. उलट अनेक नवे पेचप्रसंग यातून पुढे उभे राहतील. दीर्घावधीत रुपयाचे मूल्य सर्व चलनांच्या बाबतीत ढेपाळलेच आहे, हेही दुर्लक्षिता येणार नाही. सन २०२२ च्या सुरुवातीपासून डॉलरच्या तुलनेत रुपया ७४.३० वरून ८५.२० असा गडगडला आहे. म्हणजेच प्रत्येक डॉलर मूल्याच्या आयातीसाठी भारतीय आयातदाराला आता ८५.२० रुपये मोजावे लागतील. हेच प्रमाण या काळात युरोबाबत ८४.०४ वरून ८८.५६ पर्यंत, तर ब्रिटिश पौंडाबाबत १००.३० वरून १०६.७९ पर्यंत वाढले आहे. डॉलरबाबतीत दिसलेले अवमूल्यन हे पौंड, युरोच्या तुलनेत कमी आहे, ही समाधानाची गोष्ट नाही हेच ताजे आकडे सांगतात. याचा पहिला वाईट परिणाम गेल्या महिन्यातील भारताच्या आयात–निर्यातीच्या आकड्यांतून दिसून येतो. आयात–निर्यात या दोहोंतील तफावत अर्थात व्यापार तूट फुगून नोव्हेंबरमध्ये ३,७४८ कोटी डॉलरवर जाणे हे अधिकच गंभीर. ही तूट वाढली कारण त्या महिन्यात निर्यात घटली, तर आयात प्रचंड वाढली. यातील केवळ सोन्याची आयात ही महिनाभरात दुपटीने वाढून विक्रमी १,४८० कोटी डॉलरवर गेली. वजनाने महिन्याला सरासरी ६८ टनांच्या घरात असलेली सोने आयात नोव्हेंबरमध्ये थेट २०० टनांपुढे गेली. हाच सध्याच्या क्षणाला सर्वात मोठा धोका आहे. रुपयाचा वास्तविक प्रभावी विनिमय दर चढत गेला तर निर्यात महाग होऊन तिला पाचर बसेल. त्याउलट आयात स्वस्त बनेल. ज्यायोगे सोन्यासारख्या खरे तर उपद्रवी चीजवस्तूंची मागणी बोकाळत जाईल. रुपयाचे मूल्यच नव्हे, तर व्यापारतोलात बिघाडासाठी हा मोठा हातभारच.

# प्रशासक ते पंतप्रधान : अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहनसिंह

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई–मेल : ïïïळपलरसवशसारळश्र.लो

-----------------------------------
--

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नंतर सलग १० वर्षे पंतप्रधान म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांनी काम केले. २००४ मध्ये काँग्रेस पक्षाने यूपीए सरकार मध्ये त्यांना पंतप्रधान पदाचा बहुमान दिला, २००४ पासून २०१४ पर्यंत ते भारताचे पंतप्रधान होते. त्यानंतर सलग १० वर्ष त्यांनी पंतप्रधान म्हणून देशसेवा केली. भारताचे १४ वे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे एक विचारवंत व अभ्यासक म्हणून ओळखले जात होते. तसेच त्यांचा कामाप्रती असलेला व्यासंगी व शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचरणामुळे त्यांच्याकडे आदराने बघितले जात होते. मनमोहन सिंग यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ रोजी अखंड भारताच्या पंजाब प्रांतातील एका खेड्यात झाला. त्यांनी १९४८ साली पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांचे शैक्षणिक कर्तृत्व पंजाब विद्यापीठापासून इंग्लंड मधील केम्ब्रिज विद्यापीठा पर्यंत विस्तारलेले होते. १९५७ साली त्यांनी केम्ब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात प्रथम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त केली. त्यानंतर १९६२ साली त्यांनी ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात डी.फील संपादन केली. त्यांचे 'इंडियाज एक्स्पोर्ट ट्रेंड्स एण्ड प्रोस्पेक्ट्स फोर सेल्फ ससटेन्ड ग्रोथ' हे पुस्तक भारताच्या अंतस्थ व्यापारी धोरणाची समीक्षा करणारे आहे.




डॉ. मनमोहन सिंह हे काँग्रेस पक्षाचे सदस्य असून राज्यसभेत आसामचे प्रतिनिधित्व करीत होते. यापूर्वी ते १९९१ साली पी.व्ही. नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय अर्थमंत्री होते. त्या काळात त्यांनी केलेल्या आर्थिक सुधारणा आणि त्यानंतर झालेल्या आर्थिक प्रगतीमुळे त्यांची कार्यक्षम राजकारणी म्हणून प्रतिमा बनली आहे. मनमोहनसिंहांच्या वडिलांचे नाव गुरुमुखसिंह आणि आईचे नाव अमृतकौर. मनमोहनसिंह हे अर्थशास्त्रात उच्चशिक्षित होते. संयुक्त राष्ट्रांच्या व्यापार आणि विकास विभागात काम करीत असतांना, भारताचे तत्कालीन विदेश व्यापारमंत्री ललित नारायण मिश्रा यांनी मनमोहनसिंहांची आपल्या खात्यात सचिव म्हणून नियुक्ती केली होती.

पंजाब विद्यापीठ व प्रथितयश दिल्ली स्कूल ऑफ इकोनोमिक्स मध्ये प्राध्यापक म्हणून काम करत असताना त्यांची शैक्षणिक ओळख अधिक समृद्ध झाली. या काळात युएनसीटीएडी सचिवालयात त्यांनी काही काळ काम पहिले होते. त्यातूनच त्यांची १९८७ आणि १९९० या काळात जीनिव्हा येथील साउथ कमिशनच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाली. त्यांनी १९७१ साली वाणिज्य मंत्रालयात आर्थिक सल्लागार म्हणून जबाबदारी स्वीकारली व त्यांचा सरकारमध्ये प्रवेश झाला. त्यातूनच १९७२ साली त्यांची अर्थमंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लागार म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी अर्थमंत्रालयात भूषविलेल्या अनेक महत्वाच्या पदांमध्ये अर्थ मंत्रालयाचे सचिवपद, नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपद, रिझर्व बँकेचे गव्हर्नरपद, पंतप्रधानांचे प्रमुख आर्थिक सल्लागार व विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्षपद आदी पदांचा समावेश होतो.

१९९१ पासून राज्यसभा या वरिष्ठ सभागृहात त्यांनी खासदारपद भूषविले होते. १९९८–२००४ च्या दरम्यान त्यांनी राज्यसभेत विरोधी पक्ष नेत्याची भूमिकाही पार पडली आहे. २२ मे २००४ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकानंतर त्यांनी पहिल्यांदा व २२ मे २००९ रोजी त्यांनी दुसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड मानल्या जाणाऱ्या १९९१–१९९६ या पाच वर्षांच्या काळात त्यांनी भारताचे अर्थ मंत्रिपद भूषविले. भारताच्या आर्थिक सुधारणा अमलात आणण्यासाठी आवश्यक असलेले सर्वंकष धोरण तयार करण्यात त्यांची भूमिका जगभरात नावाजली जाते. हा काळ त्यांच्या नावाशी घट्ट जोडला गेला.

त्यांच्या कारकीर्दीत त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अनेक महत्वाच्या पुरस्कारांपैकी भारतातील दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण पुरस्कार (१९८७), भारतीय विज्ञान काँग्रेस मध्ये देण्यात येणारा जवाहरलाल नेहरू जन्म शताब्दी सन्मान (१९९५), अर्थ मंत्र्यांसाठी दिला जाणारा आशिया मनी अवार्ड (१९९३ व १९९४), केम्ब्रिज विद्यापीठाचा ॲडम स्मिथ पुरस्कार (१९५६), केम्ब्रिजमधील सेंट जॉन महाविद्यालयात उल्लेखनीय कार्याबद्दल 'राईट पुरस्कार' असे काही विशेष पुरस्कार आहेत. याशिवाय जपान निहोन कायझाई शिम्बून सारख्या अनेक संस्थांनी डॉ. मनमोहनसिंग यांना सन्मानित केले आहे. केम्ब्रिज व ऑक्सफोर्ड सारख्या अनेक विद्यापीठांकडूनही त्यांना मानद पदवी प्रदान करण्यात आली होती. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा आणि संघटनांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले असुन १९९३ मध्ये सायप्रस येथे राष्ट्रकुल प्रमुखांच्या बैठकीत आणि व्हिएन्ना येथे मानवाधिकारावरील जागतिक परिषदेत भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले.

'द क्सिडेंटल प्राइम मिनिस्टर' या चित्रपटात अनुपम खेर यांनी मनमोहनसिंहांची भूमिका केली होती. या सिनेमात काँग्रेसवर आणि गांधी घराण्यावर टीका केलेली असल्याने या सिनेमाच्या प्रदर्शनाला काँग्रेस पक्षाने विरोध केला होता. तसेच 'प्रधानमंत्री' या नावाची एक मालिका एका टी. व्ही चॅनेलवर प्रसारित झाली होती. गेल्या ६५ वर्षात १३ पंतप्रधानांच्या कार्यकाळात देशात झालेले बदल मांडण्याचा हा अनोखा प्रयत्न होता. त्यातील काही भागात मनमोहन सिंग यांची देखील कथा चित्रित केली गेली होती.

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे अत्यंत शांत, विनम्र आणि मितभाषी व्यक्तिमत्व होते. देशाच्या अर्थव्यवस्थेला सावरण्याची त्यांची क्षमता होती, हे त्यांनी अर्थमंत्री असतांना दाखवून दिले होते. त्यांची अर्थतज्ज्ञ म्हणून कामगिरी जागतिक दर्जाची होती. त्यांच्या निधनाने भारत देशाची मोठी हानी झाली आहे. देशाने एक जागतिक दर्जाचा अर्थतज्ज्ञ विद्वान गमावला आहे. अर्थविश्वाचा भारतीय कोहिनूर हरपला आहे. त्यांचा शांत विनम्र स्वभाव आणि अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांची विद्वत्तेचा अमीट ठसा भारतीय राजकारणावर नेहमीच कायम राहील. वयोमानाशी संबंधीत आजारांवर उपचारादरम्यान शर्थीचे प्रयत्न करुनही त्यांचे प्राण वाचू शकले नाही आणि शेवटी २६ डिसेंबर २०२४ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली, अशा या महान नेत्याला विनम्र, भावपूर्ण आदरांजली !

# नापास कोण?

'नापासाचा शिक्का बसून कुणी शिक्षणाच्या प्रक्रियेतून बाहेर जाऊ नये; किमान प्राथमिक स्तरावर तरी नाहीच नाही.' शिक्षण हक्क कायदा आला, तेव्हा त्यातील ना–नापास धोरणामागे असलेल्या उद्देशाचा हा थोडक्यात आशय. हे ना–नापास धोरण केंद्र सरकारने नुकतेच रद्द केले. तत्पूर्वी, सन २०१९ मध्ये शिक्षण हक्क कायद्यात झालेल्या सुधारणांचा आधार घेऊन काही राज्यांनी ते रद्द केलेच होते. महाराष्ट्रानेही गेल्या शैक्षणिक वर्षात (२०२३–२४) ही 'सुधारणा' घडवून आणली. इयत्ता पाचवी आणि आठवी या दोन इयत्तांच्या परीक्षेत नापास झाल्यास, दोन महिन्यांच्या आत फेरपरीक्षा देऊन कामगिरी सुधारण्याची आणि त्यायोगे वर्ष वाचविण्याचीही मुभा आहे. मात्र, फेरपरीक्षाही उत्तीर्ण करता आली नाही, तर त्याच वर्गात पुन्हा बसण्यावाचून गत्यंतर नाही. अशा मुलांकडे विशेष लक्ष देऊन त्यांची कामगिरी सुधारण्याकडे लक्ष दिले जाईल, असे 'धोरण रद्द'चा निर्णय जाहीर करताना शिक्षण मंत्रालयाने म्हटले आहे हे खरे. पण त्याची अंमलबजावणी शाळा आणि शिक्षकांवरच अवलंबून आहे. इयत्ता पाचवी आणि आठवीमध्ये नापास न करण्याचे धोरण बदलण्यामागे असलेल्या कारणांचा यानिमित्ताने विचार करावा लागेलच. पण त्याआधी हे धोरण काय संदर्भाने आणले गेले, याचा मागोवा घेणे क्रमप्राप्त आहे. कारण शालेय स्तरावरील मूल्यमापनाचे व्यवस्थेने कसे मातेरे केले आणि पुन्हा आपण नापासाच्या शिक्क्याकडे कसे आलो, हा प्रवास या मागोव्यातच अधोरेखित होणार आहे. सन २००९ मध्ये शिक्षण हक्क कायद्यानुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद झाली. शिक्षण हा मुलांचा हक्क असल्याची जाणीव रुजविणाऱ्या या क्रांतिकारी कायद्याने, एरवी सामाजिक–आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहू शकले असते, अशा लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी दिली. वयोगट ६ ते १४ वर्षे असा असल्याने इयत्ता पहिली ते आठवीच्या स्तरापर्यंत या कायद्यातील तरतुदी लागू होतात. या कायद्यातील एक तरतूद अशी की, कोणत्याही विद्यार्थ्याला पहिली ते आठवी या इयत्तांमध्ये नापास करता येणार नाही. नापासाचा ठपका बसल्याने अनेक मुले प्राथमिक स्तरावरच शाळा सोडत असल्याची पार्श्वभूमी या तरतुदीमागे होती. मूल शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर जाऊ नये, हा त्याचा थोडक्यात उद्देश. हा कायदा लागू झाला आणि यातील तरतुदींची चर्चा सुरू झाली, तेव्हा अनेक शाळा आणि पालकांनी असा समज करून घेतला की, विद्यार्थी नापास होणार नाहीत म्हणजे आता शाळांत परीक्षाच होणार नाहीत. परीक्षाच नसतील तर मुले पुढच्या इयत्तेत जाण्यासाठीचे निकष काय? आणि ते असेच आठवीपर्यंत परीक्षा न देता शिकत गेले, तर पुढे एकदम दहावीच्या (बोर्डाच्या) परीक्षेला सामोरे जायची वेळ आल्यावर, त्यांचे काय होईल? खरे तर या प्रश्नांची उत्तरे शिक्षण हक्क कायद्याने दाखवून दिलेल्या मार्गदर्शक वाटेने यंत्रणा गेल्या असत्या, तर मिळाली असती. पण तसे झाले नाही. इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करावे, असे कायद्यातील तरतुदींना अपेक्षित होते किंवा आहे.

इथेच खरी गोम आहे. 'सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापना'त प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत लिहिणे, त्यानुसार गुण देणे हे अपेक्षित नव्हते. पाठ केलेली उत्तरे उत्तरपत्रिकेत लिहून विद्यार्थ्यांनी पास व्हावे, होत राहावे, हे बदलण्याचाच यात रास्त इरादा होता. त्याऐवजी प्रत्येक विद्यार्थ्याचे त्याच्या वैयक्तिक कौशल्यानुसार मूल्यमापन करण्याचे काम शिक्षकांनी करणे अपेक्षित होते. एखादा चित्रकलेत पारंगत असेल, एखादा अभिनयात, एखादा गणितात, एखादा विज्ञानाकडे कल असलेला, असे प्रत्येकाचे गुण हेरून ते फुलविण्याचा प्रयत्न शिक्षकांकडून अपेक्षित होता.



भाषा, विज्ञान, गणिताचे मूलभूत ज्ञान देणेही अपेक्षिलेले होतेच. मात्र, ते परीक्षेत तोलताना इतर कौशल्यांचा विसर पडू नये म्हणून प्रगतिपुस्तकात गुणांच्या आकड्याऐवजी 'श्रेणी' देऊन विद्यार्थ्याच्या अंगभूत कौशल्यांचे आणि ते विकसित करण्याच्या प्रयत्नांचे वर्णनही अपेक्षित होते. यात शाळांना, शिक्षकांना अध्यापन पद्धतीत प्रयोग करण्याचीही मुभा होती. किंबहुना यानुसार पाठ्यपुस्तकांत बदल करून त्यात अनेक प्रयोगांच्या शक्यताही निर्माण करून दिल्या गेल्या. अगदी गणिताच्या पुस्तकात विषयाला साजेशा कविता आणण्यापर्यंतचा आणि विज्ञानातील एखादा प्रयोग प्रत्यक्ष कसा करून पाहता येईल, हे सुचवण्यापर्यंतचा प्रवास झाला. विद्यार्थी वरच्या वर्गात जाताना 'अपेक्षित' प्रश्नांची 'पाठ' केलेली उत्तरे लिहिण्याची 'परीक्षा' उत्तीर्ण करून न जाता, कौशल्यवृद्धी आणि मूलभूत संकल्पनांच्या आकलनात वाढ करून पुढे जावा, हा यामागे उद्देश होता. मात्र हे बदल शिक्षक, विद्यार्थी आणि पालक या शिक्षण व्यवस्थेतील कळीच्या घटकांपर्यंत प्रशासकीय यंत्रणांकडून प्रभावीपणे पोहोचवले गेले नाहीत. सगळी चर्चा 'परीक्षा नाही,' याभोवती आणि त्यामुळे दहावीत काय होणार, या भीतीपर्यंतच मर्यादित राहिली, ज्याची भलामण सोयीसाठी सर्वपक्षीय राजकारण्यांनीही केली. ना–नापास धोरणात झालेला बदल हा त्याचीच परिणती आहे.

ना–नापास धोरण रद्द करण्यासाठी २०१५ पासून युक्तिवाद सुरू होते. 'परीक्षाच नसल्याने, प्राथमिक शाळांत अध्ययन–अध्यापन होत नसून, त्या केवळ मध्यान्ह भोजनापुरत्या मर्यादित राहिल्या आहेत,' हा त्यातील प्रमुख. 'विद्यार्थी अभ्यास गांभीर्याने घेत नाहीत, त्यांची बोर्डाच्या परीक्षांसाठीची तयारी कच्ची राहते,' अशा आणखी पुरवण्या जोडून तो भक्कम केला गेला आणि जवळपास सर्वच राज्यांनी हे धोरण रद्द करण्याची एकमुखी मागणी केली. त्याचाच परिपाक म्हणून पाचवी ही प्राथमिक स्तराची, तर आठवी ही उच्च प्राथमिक स्तराची अखेरची पायरी मानून परीक्षा, पास– नापास आणि दोन महिन्यांत फेरपरीक्षा यांचा घाट घातला गेला आहे. खरोखरच 'सर्वंकष' आणि 'सातत्यपूर्ण' मूल्यमापन पद्धतीची प्रयोगशील अंमलबजावणी झाली असती, तर ना–नापास धोरण रद्द करताना केलेले युक्तिवाद थिटे पडले असते, हे सांगायला तज्ज्ञाचीही गरज नाही. पण परीक्षांचा धाक निर्माण करणारी व्यवस्था केली की शिक्षकांचे मूल्यमापनाचे काम सोपे होते, परीक्षांतील 'अपेक्षित उत्तरे' पुरवणाऱ्या शिकवणी वर्गांच्या, मार्गदर्शक पुस्तिकांच्या समांतर व्यवस्थेचे फावते. खासगी शाळांना, त्यांच्या मते कमी 'गुण'वत्ता असलेले विद्यार्थी वगळण्याची मुभा मिळते. इतके फायदे असल्याने 'ना–नापास धोरण रद्द'सारखे निर्णय सहजपणे होऊ शकतात.

राहता राहिला शिक्षणातील धोरण धरसोडीचा मुद्दा. साठच्या दशकातील कोठारी आयोगापासून अलीकडच्या राष्ट्रीय शिक्षण आराखड्यापर्यंतच्या सर्व धोरणात्मक शिफारशींचे सार, 'शिक्षण म्हणजे सर्वंकष व्यक्तिमत्त्व घडविण्याची प्रक्रिया' असे असेल, तर मुळात या धोरणाला आपली व्यवस्था कधी समंजसपणे सामोरी गेली का, हा प्रश्न खडसावून विचारायला हवा. शिक्षणात नवे प्रयोग स्वीकारण्याचा वकुब नाही, कुणी प्रयोग करू गेले, तर आर्थिक तरतूद नाही, शिक्षकांना प्रशिक्षण–प्रोत्साहन नाही, अनुदानित शिक्षण संस्थांना वेळेवर अनुदान नाही, खासगी संस्थांतील शुल्क परवडणारे नाही आणि तरीही शिक्षणाची सरसकट संपूर्ण जबाबदारी घ्यायला कोणतेच सरकार तयार नाही. अशा या नकारांच्या पाढ्यातच ना–नापास धोरणाचे धिंडवडे निघत असताना २०२० चे नवे 'राष्ट्रीय शिक्षण धोरण' आले. कौशल्यावर भर देण्याच्या बाता पुन्हा सुरू झाल्या. कौशल्यांवर भर हवाच; पण त्यासाठीची व्यवस्थात्मक पायरी २०१० पासून उपलब्ध होती. मूल्यमापनात मूलभूत बदल ही ती पायरी. तीवर आपली शिक्षण व्यवस्था गळपटली. या प्रवासात शिक्षण व्यवस्थेतील घटक म्हणून कोण नापास झाले, याची चर्चा होत राहील.




# संविधानाची मोडतोड करणारा वेडा नसून त्याची पाठराखण करणारा वेडा आहे - आनंदराज आंबेडकर

महाड :- भारतीय प्रजासत्ताक राष्ट्राच्या संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय नागरिकांना जगातील सर्वात श्रेष्ठ असे संविधान देऊन देशातील सर्वच स्तरातील नागरिकांना समान हक्क व अधिकार मिळवून दिला परंतु परभणी येथे एका व्यक्तीने संविधानाची विटंबना केली ज्याचा जागतिक स्तरावर आंबेडकरी विचारधारेच्या नागरिकांद्वारे जोरदार निषेध करण्यात येत आहे, परंतु शासनाच्या दडपशाहीमुळे पोलीस यंत्रणेने निषेध करणाऱ्यांना दोषी ठरवून त्यांना जेलमध्ये बंद केले आहे त्यात कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशीचा पोलिसांच्या अमानुष मारहाणीत बळी गेला, तरी सरकार मात्र निषेध करणाऱ्यांना दोषी आणि संविधानाचा अपमान करून राजद्रोह करणाऱ्या आरोपीस तो मानसिक आजाराने त्रस्त आहे म्हणून त्याने असे कृत्य केले असे सांगून त्याची पाठराखण करीत आहेत म्हणून संविधानाची मोडतोड करणारा वेडा नसून त्याची पाठराखण करणारे वेडे आहेत असे जळजळीत उद्गार सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी ९७ व्या मनुस्मृती दहन दिनाच्या प्रसंगी महाड येथे काढले. बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी मनुस्मृती दहन व महिला मुक्ती दिन या संयुक्त कार्यक्रमाचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले होते, सदर प्रसंगी आनंदराज आंबेडकर व मनिशाताई आंबेडकर यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला





पुष्पहार अर्पण केले, तसेच भन्ते महेंद्र थेरो यांनी अत्यंत सुमधुर आवाजात  धार्मिक पूजापाठ केले, सरचिटणीस राजेश घाडगे यांनी अत्यंत प्रभावीपणे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कर्नाटक मधील डॉ. सरस्वती आणि धम्मसांगिनी यांनी कर्नाटकी भीमगीतांचा सुंदर कार्यक्रम सादर करून उपस्थितीतांमध्ये नवचैतन्य निर्माण केले, परभणी मधील डॉ. प्रमिलाताई लीला संपत या गेली २९ वर्षे महाड क्रांतिभूमीत हजारो महिलांना घेऊन येतात व महिला मुक्त दिन व मानव मुक्ती दिन सादर करतात त्यांनीदेखील आपले विचार व्यक्त केले तसेच छत्रपती संभाजीनगर मधील अभिनेत्री सत्यभामा सौदमळ यांनीही आपले विचार व्यक्त केले आनंदराव आंबेडकरांनी या तिघींचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला, तद्नंतर माजी कार्याध्यक्ष किशोर मोरे, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांनीही आपले विचार व्यक्त केले. सदर प्रसंगी बौद्धजन पंचायत समितीचे उपसभापती विनोद मोरे, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, सरचिटणीस राजेश घाडगे, चिटणीस श्रीधर साळवी, लवेश तांबे, यशवंत कदम, अनंत कदम, भगवान तांबे, अनिरुद्ध जाधव, श्रीधर जाधव, रवींद्र शिंदे, संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार, विश्वस्त राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, तुकाराम घाडगे, अरुण गमरे, विलास जाधव, सुशीलताई जाधव, अंजलीताई मोहिते, प्रमिलाताई मर्चंडे, मंगेश गायकवाड, गजानन तांबे, निवडणूक समितीचे अध्यक्ष मिलिंद जाधव, अशोक जाधव व सखाराम जाधव (महाड तालुका), दगडू गमरे (पोलादपूर), रवींद्र मोरे (माणगाव तालूका), श्रीपाल कवाडे (श्रीवर्धन), एडव्होकेट प्रमोद कांबळे (पेण तालुका), प्रकाश येलवे (मुरुड), विजय गायकवाड (पनवेल तालुका), गजानन साळवी (म्हसळा तालुका), अनंत मोरे (तळा तालुका), निल मोहिते (सुधागड तालुका), विष्णू मोरे (अलिबाग तालुका), संजय जाधव, प्रकाश कांबळे (उरण तालुका), प्रकाश पवार व सुहास कांबळे (रत्नागिरी तालुका), विकास शिंदे (रोहा तालुका) दिलीप कासारे (दापोली तालुका), दीपक जाधव (संगमेश्वर तालुका), विजय तांबे, महेंद्र गायकवाड आणि इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात लाडकी बहीण योजनेच्या नावाखाली महिलांना भावनिक करून त्यांची मत आपल्या बाजूने वळवून घेतली त्यामुळे आज राज्यात अनेक अत्याचार, दंगल असे प्रकार घडत आहेत तरी सर्वांनी यावर आत्मपरीक्षण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या मतदान या अमूल्य अधिकाराचा योग्य तो वापर केला पाहिजे, तसेच तीन वर्षानंतर मनुस्मृती दहन दिनाचे शताब्दी वर्षे येणार आहे तेव्हा समाजातील दरी दूर करून घराघरात, गावागावात, तालुका तालुक्यात, जिल्हा जिल्ह्यात आणि संपूर्ण देशात सर्व समाजच संघटन होऊन सर्व समाज एकसंघ झाला पाहिजे आणि सर्वांनी एकत्र येऊन मनुस्मृती दहन शताब्दी वर्ष साजरे केले पाहिजे असे प्रतिपादन केले. सरतेशेवटी सरचिटणीस राजेश घाडगे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# आज बीड येथील सर्वपक्षीय मोर्चात बहुसंख्येने सहभागी व्हावे

केज/प्रतिनिधी :-केज तालुक्यातील मस्साजोगचे युवा सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्घृणपणे हत्या करण्यात आली. मात्र आणखीही मुख्य आरोपी मोकाट फिरत आहेत. त्यामुळे संतोष देशमुख यांना न्याय मिळण्यासाठी व त्यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करण्यासाठी सर्वपक्षीय मोर्चा दिनांक २८ डिसेंबर रोजी बीड येथे आयोजित केला आहे. या मोर्चाच्या नियोजनासाठी केज येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या मोर्चामध्ये जिल्ह्यातील बहुसंख्य नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन या बैठकीत करण्यात आले.



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या मुख्य सूत्रधाराला तुरुंगात टाकावे, यातील मुख्य मास्टरमाईंडला तात्काळ अटक करावे या मागणीसाठी शनिवारी दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यामध्ये बीड जिल्ह्यातून हजारो नागरिक मोर्चामध्ये सहभागी होणार आहेत. सरकार आणि पोलीस प्रशासनाने तात्काळ कृती करून मारेकऱ्यांना ताब्यात घ्यावे. तसेच सदरील खटला जलदगती न्यायालयात चालवून दोषींना फासावर लटकावे या व इतर मागण्यांसाठी मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातील बहुसंख्य नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन या बैठकीत उपस्थितांनी केले. यावेळी या बैठकीला रमेश आडसकर, अंकुश इंगळे, ऋषीकेश आडसकर, विजयकुमार भन्साळी, मोहन गुंड,किसन कदम,नसीर नेता, मौला सौदागर, राधेश्याम तोष्णीवाल, बिलोली फारोकि, मकसुद फारोकी, दिलीप गुळभिले, राजू जाकेटिया, सुनील गलांडे, संतोष सोनवणे यांचेसह विविध गावचे सरपंच, चेअरमन, प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज तालुक्यातील कानडीमाळी व वरपगाव येथे महिलांनी स्त्रीमुक्तीदिन केला साजरा



केज/प्रतिनिधी-दिनांक २५ डिसेंबर २०२४ रोजी अंकुरस्वयंसेवी संस्था व स्थानिक महिला मंडळातील प्रमुख महिला यांच्या वतीने केज तालुक्यातील कानडीमाळी व वरपगाव येथे स्त्रीमुक्तीदिन साजरा करण्यात आला आहे . अनिष्ट प्रथा,परंपरा,रूढी, चालीरिती,महिलांना दुय्यम स्थान असणारी वागणूकीसह मनुवादी व्यवस्थेचे महिलांनी दहन केले आणि समताधिष्ठित समाज निर्माण होण्यासाठी संविधानिक मूल्यांचा स्विकार केला आहे. यावेळी उपस्थित महिलांनी संविधानांच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. आम्ही सबला आहोत, माणुस म्हणुन सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी आमची पायवाट सुरू आहे. यात प्रामुख्याने महिला लीडर तसलीम इनामदार,छाया राऊत, वच्छला राऊत,शांताताई , सुरेखा गरूड,वैजंता गालफाडे,शिलाताई देवकर,निता देशमुख,शिलाताई हजारे , तसेच अनिताताई कांबळे,लक्ष्मण हजारे,उर्मिला गालफाडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# करुणा मैत्री हा बुद्धांचा वैश्विक संदेश आहे - पु.भिक्खु आतुरलीय रतन महाथेरो







लातूर / प्रतिनिधी :- तथागत भगवान बुद्ध हे जगाचे मार्गदर्शक आहेत. त्यांनी संपूर्ण मानव जातीसाठी वैश्विक संदेश दिलेला आहे. मानवता, शांती, करुणा, मैत्री हे भगवान बुद्धांच्या शिकवणीचे मूळ सिद्धांत आहे आणि म्हणून भगवान बुद्धांची एकूणच सर्व शिकवण मी मानव जातीला भेटलेली एक अमूल्य देणगी आहे, म्हणूनच भगवान बुद्धांची नैतिक शिकवण मानवासाठी वैश्विक संदेश असल्याचे प्रतिपादन पु.भिक्खू आतुरलीय रतन महाथेरो (श्रीलंका) यांनी यावेळी केले.

बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त येथील उपासकांच्यावतीने दि. २५ डिसेंबर २०२४ रोजी महाविहार सातकर्णी नगर येथे आयोजित करण्यात आली होती.

प्रारंभी धम्म परिषदेच्या सकाळच्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे भारतीय बौद्ध महासभेचे लातूरचे जिल्हाध्यक्ष एम. एम. बलांडे यांच्या हस्ते पंचरंगी धम्मत्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले, यावेळी समता सैनिक दल यांच्या सैनिकाद्वारे सलामी देण्यात आली.

यावेळी बुद्धमूर्ती सहित भिक्खु संघाच्या उपस्थितीमध्ये बौद्ध उपासक उपासिकांच्या सहकार्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून धम्म मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. या धम्म मिरवणुकीची सांगता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे झाली.

यानंतर दुपारच्या उद्घाटकीय सत्रामध्ये महाविहार धम्म केंद्र सातकर्णी नगर, बार्शी रोड, ता. जि. लातूर येथे पु. भिक्खु डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शखाली सातव्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे उद्घाटन श्रीलंका येथील माजी खासदार पु. भिक्खु अतुरलीय रतन महाथेरो यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राज्याचे सहकार मंत्री नामदार मा. बाबासाहेब पाटील, माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार मा. संजय बनसोडे, औसा येथील आमदार मा. अभिमन्यू पवार, माजी नगराध्यक्ष मा. लक्ष्मण कांबळे या सोबतच विशेष अतिथी म्हणून दिल्लीचे माजी सामाजिक न्याय मंत्री मा. राजेंद्र पाल गौतम, मुरुड येथील पोलीस अधिकारी अशोक उजगिरे, डी. बी. सानप, पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे, डॉ. एस. पी. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी पूजनीय भिक्खू संघाच्यावतीने उपस्थितांना त्रिसरण पंचशील देण्यात आले. या नंतर बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट तथा सर्व बौद्ध उपासकांच्यावतीने राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार देण्यात आला.

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे संचालक इंजि. अनिलकुमार गायकवाड, अमृतराव सूर्यवंशी, डी. एस. नरसिंगे, सेवा आधार बहुउद्देशीय संस्थेचे विशाल भोपनिकर यांना राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी भिक्खु अतुरलीय रतन महाथेरो म्हणाले की, बौद्ध धम्म उपकारक असणारी जीवन पद्धती आहे. बुद्ध धम्माचा विचार भेद विरहित असल्याने बुध्दाची सामाजिक समता मानव जातीसाठी एक मोठी देणगी आहे. यावेळी विशेष अतिथी राजेंद्र पाल गौतम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचे महत्त्व व्यक्त करताना, आंबेडकरी चळवळ ही देशाची मुख्य चळवळ असून तिला वाढवणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष भिक्खु डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे सर यांनी केले या प्रसंगी पु. भिक्खु धम्मसेवक महाथेरो, पु. भिक्खु डॉ. यशकाश्य पायन महाथेरो, पु. भिक्खु डॉ. खेमोधम्मो महाथेरो, पु. भिक्खु सत्यपाल महाथेरो, पु. भिक्खु महाविरो थेरो,पु. भिक्खु धम्माणंद थेरो,पु. भिक्खु बोधिधम्मा, पु. भिक्खु पय्यावंस, सातव्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे मुख्य संयोजक पु. भिक्खु पय्यानंद महाथेरो व पु. भिक्खु आर्या मेत्ता, ई. भिक्खु संघाची मार्गदर्शनपर धम्मदेशना झाली. या धम्म परिषदेत सातकर्णी स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले

सातव्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेच्या रात्रीच्या शेवटच्या सत्रामध्ये महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध क्रांतीशाहीर सचिन माळी व शीतल साठे यांचा बुद्ध भीम गीताचा आंबेडकरी जलसा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी धम्म परिषदेसाठी लातूर शहरातील प्रतिष्ठित मान्यवर, बौद्ध उपासक, उपासिका, तरुण युवा मंडळ, महिला मंडळ सह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सातव्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेच्या शेवटी धम्म परिषदेचे ठराव वाचन करून सामूहिक राष्ट्रगीताने धम्म परिषदेचा समारोप झाला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविहार धम्म सेवक ग्रुपने परिश्रम घेतले.

## महेंद्र ताजणे यांच्या खूप काही आणखी कवितासंग्रहाचे २९ डिसेंबर रोजी विमोचन



वाशीम/प्रतिनिधी :- आंबेडकरवादी चिंतनादर्शी कवी महेंद्र ताजणे यांच्या चौथ्या खूप काही आणखी कवितासंग्रहाचे विमोचन दि. २९ डिसेंबर २०२४ रोजी रविवार रोजी शासकीय जिल्हा ग्रंथालय, वाशिम येथे सकाळी ठीक अकरा वाजता होत आहे. कवितासंग्रहाच्या विमोचन दरम्यान ज्येष्ठ कवी, आंबेडकरवादी विचारवंत डॉ. यशवंत मनोहर हे कवितासंग्रहावर आभासी पद्धतीने भाष्य करणार आहेत. प्रकाशनारंभाचे उद्घाटन वाशिम यवतमाळ मतदार संघाचे खासदार संजयभाऊ देशमुख, कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी अनिल कांबळे, ज्येष्ठ चित्रकार आणि विख्यात कवी मंगेश नारायणराव काळे यांच्या हस्ते विमोचन होईल तर कवितासंग्रहावर आंबेडकरवादी विचारवंत आणि समीक्षक डॉ. प्रकाश राठोड बीजभाष्य करतील. प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा परिषदेचे कार्यकुशल अध्यक्ष चंद्रकांतदादा ठाकरे, जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती सुरेशभाऊ मापारी, आंबेडकरी विचारवंत रवींद्र इंगळे चावरेकर, ज्येष्ठ कवी दिनकर मनवर, प्रसिद्ध हृदयविकारतज्ञ व समाजधुरीनी डॉ. सिद्धार्थ देवळे, बालरोगतज्ञ तथा समाजसेवक डॉ. तुषार गायकवाड आणि शासकीय जिल्हा ग्रंथालयाचे ग्रंथाधिकारी आदीं मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे .

विमोचन दरम्यान आंबेडकरवादी चळवळीतील ज्येष्ठ नेते गोपाळराव आटोटे गुरुजी, पँथर रिपाई नेते गोवर्धन चौथमल, आंबेडकरवादी कादंबरीकार, ज्येष्ठ साहित्यिक विलास अंभोरे आदींचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार होणार आहे.

दरम्यान विमोचन सांगितीचे प्रस्ताविक शेषराव पिराजी धांडे, कविता वाचन, दीपक ढोले पाहुण्यांचा परिचय, मोहन शिरसाठ संचालन, सुभाष गोविंदा अंभोरे करतील,आभार अनंतकुमार जुमडे करणार आहेत. सदर कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कवी महेंद्र ताजणे, वंदना ताजणे व आयोजकांनी केले आहे.

## माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट देऊन कामकाजाचा घेतला आढावा



लातूर/ प्रतिनिधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. २७ डिसेंबर रोजी दुपारी लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट देऊन संचालक मंडळाकडून चालू असलेल्या कामाचा आढावा घेऊन संबंधितांना आवश्यक सूचना केल्या. प्रारंभी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व मान्यवरांनी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग व लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच संचालक मंडळाने दोन मिनिटे स्तब्ध राहून माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यानंतर लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सर्व संचालकांच्या उपस्थितीत बाजार समितीच्या चालू असलेल्या कामासह शेतमालाची दैनदीन आवक, मिळत असलेला भाव व दैनदीन कामाची माहीती घेतली, येथील कामाच्या संदर्भात संबंधितांना आवश्यक सूचना केल्या. यावेळी लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडिले, प्रभारी सचिव अरविंद पाटील, संचालक सर्वश्री अनिल पाटील, श्रीनिवास शेळके, शिवाजी कांबळे, सुभाष घोडके, अनंत पवार, सचिन सूर्यवंशी, बालाजी वाघमारे, बालाप्रसाद बीदादा, सुधीर गोजमगुंडे, युवराज जाधव, लक्ष्मण पाटील, बळवंत पाटील, आनंद पाटील, तुकाराम गोडसे, शिवाजी देशमुख, आनंद मालू, अभय शहा आदिसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## बोगस पीकविम्याची चौकशी करा - सचिन दाने यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



लातूर /प्रतिनिधी :- लातूर जिल्ह्यातही बोगस पीकविम्याची प्रकरणे असल्याची चर्चा होत असून या घोटाळ्याची तात्काळ चौकशी करावी,अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

दाने यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लातूर जिल्ह्यात एसबीआय पीक विमा कंपनी विम्याचे कामकाज पाहते.इतर जिल्ह्यात पिकविम्यात घोटाळे झाल्याचे उघड झाल्यानंतर लातूर जिल्ह्यातही यात घोटाळा असल्याचे बोलले जात आहे.या संदर्भा जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ चौकशी करावी.पीकविम्या बाबतीत संबंधित विमा कंपनी आणि जे सरकारी अधिकारी दोषी आढळतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी. यात दोषी आढळली तर एसबीआय पीक विमा कंपनीला ब्लॅक लिस्ट करावे.संबंधित कंपनीच्या चौकशीसाठी एसआयटीची स्थापना करावी,आदी मागण्याही दाने यांनी निवेदनात केल्या आहेत.

खरीप २०२३ मध्ये ३ लाख ८ हजार ९२४ शेतकऱ्यांची केवळ २५ टक्के अग्रिमवर बोळवण केली. त्यांचा उर्वरित ७५ टक्के विमा सुद्धा अद्याप मिळालाच नाही. पिक विमा कंपनी आपल्या सोयीनुसार पंचनामे करते. लातूर जिल्ह्यात सुद्धा एसबीआय पिक विमा कंपनीचा महाघोटाळा असून याचा लवकरच पर्दाफाश करणे गरजेचे आहे, अन्यथा हजारो शेतकऱ्यांचे कोटींचे नुकसान होणार आहे.

विविध कारणांनी शेतकरी संकटात सापडलेला आहे.कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी यामुळे उत्पन्नावर परिणाम होत आहे. पिकावर पडणाऱ्या रोगांनी शेतकरी बेजार झाला आहे.अशावेळी पीक विम्याचा शेतकऱ्याला आधार मिळतो. परंतु त्यातही विमा कंपन्या आणि घोटाळेबाज, शेतकऱ्यांना फसवत आहेत.अशा घोटाळेबाजांना अद्दल घडविण्याची गरज आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## मुख्याध्यापकांचे दोन दिवसीय राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलन स्थगित

लातूर : अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ पुणेच्या वतीने लातुरात दि. २८ व २९ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेले दोन दिवसीय मुख्याध्यापकांचे ६१ वे राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलन माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या आकस्मिक निधनामुळे स्थगित करण्यात आल्याची माहिती लातूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तथा राज्याचे उपाध्यक्ष प्रकाश देशमुख यांनी दिली. आता हे संमेलन येत्या दि. १० व ११ जानेवारी २०२५ रोजी होणं असल्याचेही त्यांनी सांगितले.

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या निधनामुळे देशात सात दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर सदर शैक्षणिक संमेलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संमेलनाची जय्यत तयारी झालेली असतानाच ही दुःखद घटना घडली. त्यामुळे सदर संमेलन स्थगित झाल्याची नोंद राज्यातील सर्व मुख्याध्यापकांनी घ्यावी. हे संमेलन आता दि. १० व ११ जानेवारी रोजी त्याच ठिकाणी म्हणजे थोरमोटे लॉन्स, औसा रोड, लातूर या ठिकाणी होणार असून त्या संमेलनास राज्यभरातील मुख्याध्यापक प्रतिनिधींनी आवर्जून उपस्थित रहावे ,असे आवाहनही मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे संयुक्त अध्यक्ष रावसाहेब आवारी, अध्यक्ष के.एस. मसे , कार्याध्यक्ष मोहन सोनवणे , राज्य उपाध्यक्ष नंदकुमार बारवकर, शत्रुघ्न बिरकड, अशोक मोरे, मराठवाडा अध्यक्ष संजय शिप्परकर , उपाध्यक्ष देविदास उमाटे, कांचन महाजन, नामदेव सोनवणे, सचिव जालिंदर पैठणे, विदर्भ अध्यक्ष सतीश जगताप, उपाध्यक्ष मंदा उमाटे, विनोद संगीतराव, सचिव विलास भारसाकळे, लातूर जिल्हा अध्यक्ष प्रकाश देशमुख, सचिव बजरंग चोले , कोषाध्यक्ष शिवराज म्हेत्रे, प्रवक्ते कालिदास शेळके, उपाध्यक्ष रमेश मदरसे, सचिन साबणे, उमेश पाटील, श्रीमती जयश्री ढवळे , मार्गदर्शक दिलीप धुमाळ, धनराज चिद्रे , सुवर्णा जाधव, दत्तात्रय पारवे ,अनिल कारभारी, रामेश्वर कदम, बालाजी मुंडे, एस.व्ही. मादलापूरे, परवेजखान पठाण, विशाल पात्रे , जयश्री पाटील आदी पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## रविवारी धनगर समाजाचा राज्यस्तरीय वधु वर परिचय मेळावा प्रा.लक्ष्मण हाके, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांची प्रमुख उपस्थिती





लातूर :- पुण्यश्लोक अहिल्यादेवी हाॅळकर सर्वांगिण विकास मंडळ व्दारे प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी धनगर समाजाचा १९ वा राज्यस्तरीय वधु - वर परिचय मेळावा रविवार, दि.२९ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी १०.०० वा. विष्णुदास मंगल कार्यालय, अहिल्यादेवी होळकर चौक, नवीन रेणापुर नाका, अंबाजोगाई रोड लातूर येथे संपन्न होणार आहे. या मेळाव्यास उद्घाटक म्हणून ओबीसी नेते मा.प्रा.लक्ष्मण हाके व प्रमुख पाहुणे म्हणुन सामाजिक कार्यकर्त्या मा. डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांची उपस्थिती लाभणार आहे. तरी या भव्य दिव्य वधू - वर परिचय मेळाव्यास सर्व समाज बांधवानी उपस्थित राहावे असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर :- कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २६ डिसेंबर, २०२४ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ९ जानेवारी, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE